# शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

जलंब रोड, खामगांव-444303, जि. बुलडाणा (महाराष्ट्र राज्य)
Phone No.- (07263) 252278,256644 E-mail:- office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

---

**महत्वाची सूचना**

क्र : शातनिखा/विवि/परीक्षा अर्ज/2020/1753
दिनांक : 12/11/2020

**विषय : संस्थेतील अंतिम सत्र / वर्ष वगळून उर्वरित विदयार्थ्यांना बॅकलॉग विषयाकरिता उन्हाळी परिक्षा-2020 चे परिक्षा अर्ज भरण्याकरीता एक शेवटची संधी देणेबाबत.**

**संदर्भ :** मा. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-40/ उ. प. 2020/ परीक्षा अर्ज/2020/095, दिनांक 12/11/2020.

वरील संदर्भिय विषयानूसार संस्थेतील **अंतिम सत्र / वर्ष वगळून** उर्वरित विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, **बॅकलॉग विषयाकरिता उन्हाळी परिक्षा-2020 चे परिक्षा अर्ज** भरण्याकरीता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून विदयार्थ्यांना एक शेवटची संधी म्हणून खालीलप्रमाणे वेळापत्रक देण्यात आले आहे.

| अ. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| 1 | विदयार्थ्यांनी Login मधून परीक्षा अर्ज भरणे | दि. 17/11/2020 ते दि. 18/11/2020 |
| 2 | विदयार्थ्यांनी भरलेले/संस्थेमधून भरलेले परीक्षा अर्ज संस्थेने Institute Login मधून कन्फर्म करणे | |

**परीक्षा शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने SBI Collect वर भरणा करावे . त्यानंतर पूर्णपणे भरलेले अर्ज व शुल्काची पावती संस्थेच्या विदयार्थी विभागात जमा करावी व स्वत:चे परीक्षा अर्ज कन्फर्म झाले की नाही याची खात्री करावी.**

**Covid-19 (Corona) च्या पार्श्वभुमीवर सदर कामाकरीता विदयार्थ्यांनी शासनाव्दारे व संस्थेव्दारे वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन सदर प्रक्रीया करावी.**

**टिप :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत याआधी उन्हाळी परीक्षा - 2020 अंतिम सत्र / वर्ष वगळून नियमित विदयार्थ्याकरीता आणि अंतिम सत्र / वर्षातील विदयार्थी व त्यांच्या बॅकलॉग विषयाकरीता घेतलेली परीक्षा या **दोन्ही परीक्षेतील अनुत्तीर्ण विदयार्थ्यासाठी परीक्षा अर्ज हे हिवाळी - 2020 च्या परीक्षा अर्ज कालावधीत उपलब्ध** करुन देण्याबाबत सूचविलेले आहे. याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**सहपत्र :** संदर्भिय महत्वाचे परिपत्रक.

(डॉ.एस.एस.प्रभुणे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन खामगांव

प्रतिलिपी- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना -

1. मुख्य सुचना फलक .
2. सर्व विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी ही सूचना विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणावी - संगणक अभि./अणुविदयुत अभि./विदयुत अभि./ स्थापत्य अभि./यंत्र अभि.
3. प्रोग्रामर यांना संस्थेच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता .

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२११०/१८८/१९०

Email: secretary@msbte.com Web : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४०/उ.प.२०२०/परीक्षा अर्ज/२०२०/ 095 दिनांक – 12 NOV 2020

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित संस्था

**विषय: अंतिम सत्र/ वर्ष वगळून उर्वरित विद्यार्थ्यांना बॅकलॉग विषयाकरिता उन्हाळी परिक्षा-२०२० चे परिक्षा अर्ज भरण्याकरीता एक शेवटची संधी देणेबाबत**

संदर्भ: मंडळाचे महत्त्वाचे परीपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ. प.२०२०/०८७, दि. ०९/११/२०२०

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाद्वारे आपणांस अंतिम सत्र / वर्ष वगळून उर्वरित सर्व विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयाच्या परीक्षेच्या आयोजनाबाबत कळविण्यात आले आहे.विद्यार्थ्यांच्या प्राप्त विनंतीनुसार अंतिम सत्र/वर्ष वगळून उर्वरित विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांकरिता उन्हाळी परीक्षा – २०२० करीता परीक्षा अर्ज भरण्यासाठीची शेवटची संधी देण्यात येत आहे. त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | प्रकिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी Login मधून परीक्षा अर्ज भरणे | दि. १७/११/२०२० ते दि. १८/११/२०२० |
| २ | विद्यार्थ्यांनी भरलेले / संस्थेमधून भरलेले परीक्षा अर्ज संस्थेने Institute Login मधून कन्फर्म करणे | दि. १७/११/२०२० ते दि. १८/११/२०२० |
| ३ | विभागीय कार्यालयांनी संस्थांनी कन्फर्म केलेले परीक्षा अर्ज निश्चित करणे | दि. १८/११/२०२० ते दि. १९/११/२०२० |
| ४ | विभागीय कार्यालयांमार्फत परीक्षा अर्ज निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. १९/११/२०२० |

अंतिम सत्र/वर्ष वगळून उर्वरित विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांकरिता उन्हाळी – २०२० परीक्षेचे अर्ज विहीत कालावधीत भरून विद्यार्थांनी परीक्षेचे शुल्क आपल्या संस्थेशी संपर्क साधून ऑनलाईन पद्धतीने अथवा प्रचलित पद्धतीने संस्थेस अदा करावे व संस्थेमार्फत परीक्षा अर्ज निश्चित केला असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच संस्थांनी सुद्धा विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज व प्राप्त परीक्षा शुल्क तपासून विहीत कालावधीत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित करावेत. तदनंतर विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऑनलाईन द्वारे अदा करावे व संस्थास्तरावर निश्चित करण्यात आलेले सर्व परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयाने निश्चित केल्याची खात्री करून घ्यावी. तसेच संबंधित विद्यार्थांचे परीक्षा अर्ज भरून घेतल्याबाबतचे हमीपत्र संस्थेच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने ईमेलद्वारे विभागीय कार्यालयास देण्यात यावेत.

उन्हाळी परीक्षा – २०२० करीता मंडळाने अंतिम सत्र/ वर्ष वगळून नियमित विद्यार्थ्यांचा निकाल दि. १४/०७/२०२० रोजी तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थी व त्यांच्या असलेल्या बॅकलॉग विषयाचा निकाल दि. ०३/११/२०२० रोजी जाहीर केला आहे. या दोन्ही परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज हिवाळी परीक्षा – २०२० च्या परीक्षा अर्ज कालावधीत उपलब्ध करून देण्यात येतील, याची नोंद घेण्यात यावी व आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे.

सर्व प्राचार्यांनी आपल्या संस्थेतील उन्हाळी – २०२० परीक्षेकरीता अंतिम सत्र / वर्ष वगळून विद्यार्थ्यांचे बॅकलॉग विषयांचे परीक्षा अर्ज विहीत मुदतीत न भरलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक अवगत करून त्यांचे उन्हाळी – २०२० परीक्षेकरीताचे परीक्षा अर्ज विहीत कालावधीत भरले जातील, याची दक्षता घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, **मुंबई**

**प्रत माहीतीसाठी:**
**मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई**
**प्रत माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:**
**उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद**